# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:27.09.2025** **वार:शनिवार**

1. राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र सरकार खंबीरपणे उभं असल्याची पंतप्रधानांची ग्वाही
2. देशभरात उभारलेल्या बीएसएनएलच्या स्वदेशी फोर जी यंत्रणेचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन
3. राज्य लोकसेवा आयोगाची उद्या होणारी नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा आता येत्या 9 नोव्हेंबरला होणार आणि
4. राज्याच्या विविध जिल्ह्यांत अतिवृष्टीमुळं मोठं नुकसान; आजही मराठवाड्यासह पुणे, सातारा आणि कोल्हापूर घाट परिसराला मुसळधार पावसाचा इशारा

**पंतप्रधान-मुख्यमंत्री**

महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी केंद्र सरकार खंबीरपणे उभं आहे, अशी ग्वाही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्लीत पंतप्रधानांची भेट घेतली. राज्यातली अतिवृष्टी, पूरस्थिती आणि त्यामुळं शेतकऱ्यांचं झालेलं नुकसान याबाबत त्यांनी पंतप्रधानांना माहिती दिली, तसंच केंद्र सरकारकडून भरीव मदतीसाठी निवेदनही त्यांना सादर केलं, त्यावेळी पंतप्रधानांनी हे आश्वासन दिल्याचं फडणवीस यांनी माध्यमांना सागितलं.

राज्यातील संरक्षण कॉरिडॉर, गडचिरोलीतील पोलाद उत्पादनासाठी सवलती, दहिसर इथल्या भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या जागेचं हस्तांतरण अशा विविध विषयांवरही यावेळी सविस्तर चर्चा झाली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या 8 आणि 9 ऑक्टोबर रोजी फिनटेक परिषदेसाठी मुंबईत येणार असून, नवी मुंबई विमानतळ आणि मेट्रो-3 या प्रकल्पांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. दरम्यान नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचंच नाव देण्यात येईल, तसा प्रस्ताव आम्ही पाठविला आहे, अशी माहितीही मुख्यमंत्र्यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नवी दिल्लीत नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांचीही सदिच्छा भेट घेतली.

**बीएसएनएल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी ओडिशातील झारसूगुडा इथून बीएसएनएलच्या स्वदेशी फोर जी नेटवर्क यंत्रणेचं लोकार्पण आज करणार आहेत. देशभरात सुमारे 98 हजार ठिकाणी बीएसएनएल फोर जी यंत्रणा बसवण्यात येणार आहे. ही यंत्रणा नंतर फाईव-जीमध्येही रुपांतरित केली जाईल असं दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल माध्यमांना सांगितलं. आत्मनिर्भर भारत संकल्पनेला बळकटी देणाऱ्या, या उपक्रमाचा राज्यातील प्रारंभ, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पुण्यातून होणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदेही या कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

**सेवापर्व-वारसा जतन**

भारताच्या सांस्कृतिक वारशाचं जतन आणि संवर्धन व्हावं यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, केंद्र सरकार विविध पातळ्यांवर काम करत आहे. आजच्या सेवा पर्वच्या भागात ऐकुया भारताच्या सांस्कृतिक पुनरुज्जीवनाबाबतचा वृत्तांत.....

**भारताचा सांस्कृतिक वारसा अधोरेखित करणाऱ्या अनेक कलाकृतींची परदेशात तस्करी करण्यात आली होती,अशा अनेक मौल्यवान कलाकृती आता राजनैतिक मार्गांनी, कायदेशीर कारवाईद्वारे आणि सांस्कृतिक सहकार्याद्वारे परत मिळवल्या जात आहेत. 2014 पासून अशा 642 पुरातन वस्तू, शिल्प पुन्हा भारतात आणण्याची प्रक्रिया सुरू आहे. ख्रिस्तपूर्व तिसऱ्या शतकातील भगवान बुद्धांचे पिप्रहवा अवशेष, यूकेमधील ब्रह्मा आणि ब्राह्मणीचे शिल्प, अमेरिकेतील दुर्गेची प्रतिमा, अमेरिकेतील नटराजाचे वालुकाशिल्प अशा काही वस्तू भारतात आणल्या आहेत; तर काही पंतप्रधान मोदींना त्यांच्या परदेश दौऱ्यांदरम्यान परत करण्यात आल्या आहेत. याबाबत बोलताना पंतप्रधान म्हणतात...**

**देशाचा वारसा हा केवळ इतिहास नसूनतो मानवतेची अनुभूति आहे, असं पंतप्रधानांनी एका भाषणात म्हटलं होतं..... हाच वारसा जतनकरण्यासाठी केंद्र सरकार अविरत काम करत आहे......**

**<u>शनिवार बाजार उपक्रम-हिंगोली</u>**

शालेय विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळावं, त्यांना व्यावसायिक कौशल्य शिकवावीत या हेतूनं हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यात जिल्हा परिषद शाळेने एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. काय आहे हा उपक्रम जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून....

**दर महिन्याच्या शेवटच्या शनिवारी विद्यार्थ्यांकडून शाळेत बाजार भरविला जातो. शाळेच्या प्रांगणातील या बाजारात ग्रामस्थ येऊन आठवडी बाजाराप्रमाणे विद्यार्थ्यांनी थाटलेल्या दुकानातून वस्तूंची खरेदी करतात. यातून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळते. तसेच व्यावसायिक कौशल्य विकसित होते. आर्थिक उलाढालीकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन विकसित होतो. यासाठी सुरू केलेला हा 'शनिवार बाजार' विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कौशल्य विकासासाठी स्तुत्य उपक्रम ठरतो. या उपक्रमाची माहिती शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांना दिल्यानंतर त्यांना प्रचंड आवडला. हिंगोलीच्या जिल्हा परिषद शाळेत सुरू केलेला हा 'शनिवार बाजार' आता राज्यभरातील शाळांमध्येही सुरू करणार असल्याची घोषणा त्यांनी केली. आणि हिंगोलीच्या या उपक्रमशीलतेवर शिक्कामोर्तब झाले आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी रमेश कदम हिंगोली.**

**<u>एमपीएससी</u>**

राज्य लोकसेवा आयोगाची उद्या म्हणजे रविवारी होणारी नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा पुढं ढकलण्यात आली आहे. ही परीक्षा आता येत्या 9 नोव्हेंबरला होईल. राज्यातल्या अनेक भागात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळं अनेक गावांचा संपर्क तुटला असून येत्या दोन दिवसात पुन्हा अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. त्यामुळं ही परीक्षा पुढं ढकलण्याची मागणी, शासनाकडं होत होती. त्यानुसार राज्य सरकारनं आयोगाला विनंती केली; त्यानंतर हा बदल करण्यात आला आहे. 9 नोव्हेंबरला गट - ब अराजपत्रित सेवा संयुक्त परीक्षा नियोजित होती. ती या बदलामुळं पुढं ढकलली असून त्याची सुधारित तारीख नंतर जाहीर करू, असं लोकसेवा आयोगाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<u>अतिवृष्टी-अहिल्यानगर</u>**

राज्याच्या विविध भागात, अतिवृष्टीनं जनजीवन विस्कळीत झालं असून शेतीचं मोठं नुकसान झालं आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात गेल्या आठ दिवसापासून होत असलेल्या जोरदार अतिवृष्टीचा फटका जिल्ह्यातील अनेक महसूल मंडळांना बसला आहे. याबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**जिल्ह्यातील शेवगाव पाथर्डी आणि जामखेड या तालुक्यांना या अतिवृष्टीचा फटका बसला असून जिल्ह्यातील एक लाख हून अधिक हेक्टर क्षेत्र बाधित झाला आहे. अहिल्यानगर आणि बीड या दोन जिल्ह्याला जोडणाऱ्या गर्भगिरी डोंगर रांगांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे पाथर्डी तालुक्यातील अनेक गावांना याचा फटका बसला. अहिल्यानगरहून शेवगाव पाथर्डी कडे जाणाऱ्या कल्याण विशाखापट्टणम महामार्गावर असलेल्या नद्यांना पूर आला. त्यामुळे अनेक भागातील रस्ते उखडले असून गाव रस्ते वाहून गेले आहे. शेतकऱ्यांच्या शेतजमिनी पाण्याखाली गेल्यामुळे हातचे आलेले खरीप हंगामाचे पीक वाया गेले आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी राज्याची कृषिमंत्री दत्तात्रेय भरणे, जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शेवगाव पाथर्डी तसेच जामखेड तालुक्याचा दौरा केला. त्यांच्यासोबत मंत्री शंभूराजे देसाई हेही होते. विधान परिषदेचे सभापती प्राध्यापक राम शिंदे यांनी जामखेड तालुक्यातील अतिवृष्टीने बाधित भागाचा दौरा करून शेतकऱ्यांना दिलासा दिला. आकाशवाणी बातम्यांसाठी, मनोज सातपुते, अहिल्यानगर.**

**<u>पाऊस</u>**

**नांदेड** जिल्ह्यातील कंधार तालुक्यामध्ये सावळेश्वर इथं काल वीज पडून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. **हिंगोली** जिल्ह्यातील उर्ध्व पैनगंगा धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी इसापूर धरणाचे 2 दरवाजे उघडण्यात आले आहेत. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी, वसमत तालुक्यात केळीच्या पिकाचंही मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे.

**गडचिरोली**मध्ये काल पावसानं जोरदार हजेरी लावली; जिल्ह्यातील पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहत असल्यानं भामरागड-आलापल्ली मार्गावरील वाहतूक काल बंद होती. मात्र, संध्याकाळनंतर ही वाहतूक सुरु झाली.

**बुलडाणा** जिल्ह्यात अतिवृष्टीमुळं बाधित झालेल्या शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी नुकसान भरपाईची रक्कम दिली जाईल अशी माहिती मदत आणि पुनर्वसनमंत्री मकरंद पाटील यांनी काल बुलडाणा इथं पत्रकार परिषदेत दिली.

**परभणी** जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी काल थेट शेतात जाऊन अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेतल्या.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी काल **यवतमाळ** इथं नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली; राज्य सरकारनं दिल्लीकडे बोट दाखवणे बंद करून शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा अशी मागणी त्यांनी केली.

**आशिया चषक-क्रिकेट**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या सुपर फोर फेरीतील शेवटच्या सामन्यात काल भारतानं श्रीलंकेचा सुपर ओवर मध्ये पराभव केला. निर्धारित 20 षटकांत दोन्ही संघांच्या प्रत्येकी 202 धावा झाल्यानं सामना सुपर ओवर मध्ये खेळवला गेला. सुपर ओवर मध्ये श्रीलंकेनं प्रथम फलंदाजी करताना केवळ 2 धावा केल्यानंतर भारतानं पहिल्याच चेंडूवर 3 धावा करून विजय साकारला. अंतिम लढत उद्या भारत आणि पाकिस्तान दरम्यान होणार आहे.

**हवामान**

नांदेड, लातूर, धाराशिव, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर या नऊ जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट आणि कोल्हापूर घाट परिसरात आज मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. त्यामुळं नांदेड आणि लातूर जिल्ह्यातील सर्व शाळा, महाविद्यालयांना आज सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.